<u>हौशी मराठी दिव्यांग बालनाटय स्पर्धा</u>
पात्रता निकषाबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. हौनास्प ४९१८/प्र.क्र.२२६/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ जुलै, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. बानास्प २००२/प्र.क्र.८४/सां.का.१, दिनांक १७ ऑगस्ट, २००२
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. हौनास्प ४९१८/प्र.क्र.२२६/सां.का.४, दिनांक २ जानेवारी, २०१९
३) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सांकासं/ १२९२, दिनांक १९ मार्च, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्रातील रंगभूमी समृध्द करण्यासाठी शासनातर्फे व्यावसायिक/हौशी नाटय, बालनाटय शिबीरे व स्पर्धाचे आयोजन दरवर्षी केले जाते. बालनाटय स्पर्धेत सर्वसाधारण मुलांप्रमाणे दिव्यांग मुलांचाही लक्षणीय स्वरुपात सहभाग असतो. ही बाब विचारात घेऊन, उपर्निर्दिष्ट क्र. २ अन्वये शासनामार्फत सन २०१९ पासून दरवर्षी एका केंद्रावर दिव्यांगांसाठी स्वतंत्रपणे हौशी बालनाटय स्पर्धा आयोजित करण्यात येते. दिव्यांग मुलांचे अपंगत्व विचारात घेता, शाळा प्रवेशासाठी दिव्यांग मुलाचे वय सर्वसाधारण मुलांपेक्षा साधारणत: २ ते ५ वर्षांनी अधिक असते. यास्तव, या स्पर्धेत दिव्यांग मुलांच्या सहभागाची पात्रता निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र शासनामार्फत हौशी मराठी दिव्यांग बालनाटय स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. इयत्ता दहावीपर्यंत शिकत असलेले "दिव्यांग विद्यार्थी" या स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र ठरतील, या निकषास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०७०६१४५९३३३०२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.07.06 15:03:24 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. महालेखापाल - १, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल - १, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल - २, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. महालेखापाल - २, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१२.निवड नस्ती, सां.का.४.